

# १. राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय वसतीगृहे सुरु करणे.

राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्ह्याच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे शासनाने स्वतः इमारत भाडयाने घेवून जिल्हानिहाय वसतीगृहे कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय दि.२८.०२.२०२३ अन्वये घेण्यात आला आहे.

## वसतीगृह योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्वसाधारण नियम व अटी पुढील प्रमाणे आहेत

१. विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. सक्षमप्राधिकाऱ्याने दिलेला इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाचा जातीचा दाखला बंधनकारक असेल. तथापि, ज्या अभ्यासक्रमाकरिता जात प्रमाणपत्रा बरोबर जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक आहे, त्या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
३. आर्थिक मागास घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले आर्थिक मागास प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
४. अनाथ प्रवर्गामधून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिकाऱ्याचे अनाथ प्रमाणपत्र आनिवार्य आहे.

५. दिव्यांग प्रवर्गामधून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हा शल्यचिकित्सक यांचे ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

६. इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील व इतर कुठल्याही घटकातील विहित टक्केवारीनुसार वसतिगृह प्रवेशाकरीता विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त राहणाऱ्या जागांवर अंतर्गत परिवर्तनाने प्रवेश करता येतील.

७. अर्जदार विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रुपये २.५० लाखापेक्षा कमी असावे.

८. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय ३० वर्षापेक्षा अधिक नसावे.

९. विद्यार्थ्यांने राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, भारतीय वैद्यकीय शिक्षण परिषद / वैद्यकीय परिषद, भारतातील फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, कृषी परिषद, महाराष्ट्र तंत्र शिक्षण परिषद वा तत्सम सक्षम प्राधिकारी यांच्या मार्फत मान्यता प्राप्त महाविद्यालयामध्ये व मान्यता प्राप्त पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असावा.

१०. उच्च शिक्षणासाठी (व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृहामध्ये गुणवत्तेनुसार तसेच, संबंधित प्रवर्गनिहाय विहित आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येतील. याकरिता इयत्ता १२ वी च्या गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल.

११. व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात ७०% जागा व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात ३०% जागा राखीव ठेवण्यात येतील.

१२. विद्यार्थी अनुतीर्ण झाल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

१३. या वसतिगृहामध्ये प्रवेश हा व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश देय राहिल. ज्या पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांस पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश देय आहे त्याच पदवी अभ्यासक्रमास द्वितीय वर्षाकरिता प्रवेश देय राहील. उर्वरीत सर्व पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्ष प्रवेश देय राहील. त्यासाठी त्या त्या वेळी स्वतंत्रपणे जिल्हा सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे शासन परिपत्रक क्र.वगृयो–२०२३/प्र.क्र.१२/योजना–५, दि.१३.०३.२०२३ मधील विहित नमुन्यात प्रवेशासाठी अर्ज करावा लागेल.

१४. विद्यार्थ्यांचे स्वतःचा आधार क्रमांक संलग्न असलेल्या राष्ट्रीयकृत / शेडयूल्ड बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

१५. विद्यार्थी स्थानिक नसावा. (विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक संस्था त्या शहराच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवासी नसावा.)

१६. व्यवसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यास सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान ६० टक्के किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन / CGPA चे गुण असणे आवश्यक राहील.

१७. वसतिगृहासाठी जास्त अर्ज आल्यास गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

१८. निवडलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. तथापि, विद्यार्थी ज्या अभ्यासक्रमास प्रवेशित आहे त्या अभ्यासक्रमामध्ये कुठल्याही वर्षात अनुत्तीर्ण झाल्यास पुढील वर्षात सदर विद्यार्थ्यांचा वसतीगृह प्रवेश रद्द करण्यात येईल.

१९. प्रत्येक शासकीय वसतीगृहांत त्या त्या शैक्षणिक वर्षात रिक्त असलेल्या जागांच्या ५% जागा “विशेष बाब” म्हणुन शासनामार्फत भरण्यात येतील.

२०. शासकीय वसतीगृह प्रवेशाबाबात त्या त्या वर्षी शासनामार्फत देण्यात / निर्गमित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार

वसतीगृह प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येईल.

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क :- संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
- **शासन निर्णय क्रमांक :-**
  1. **वगृयो-२०२०/प्र.क्र.०१/योजना-५, दि.२९.११.२०२२**
  2. **वगृयो-२०२०/प्र.क्र.०१/योजना-५, दि.२८.०२.२०२३**
  3. **वगृयो-२०२३/प्र.क्र.१२/योजना-५, दि.१३.०३.२०२३**
  4. **वगृयो-२०२०/प्र.क्र.०१/योजना-५, दि.१९.१२.२०२३**